अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# आता चोरांनाही एनी टाईम मनी

तंत्रज्ञान हवे असेल, आधुनिकता हवी असेल, तर तेवढी जोखीमही स्वीकारावी लागेल. निदान भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात ही काळजी घेणे गरजेचे आहे. आपला देश काही १०० टक्के साक्षर नाही. गरिबी, बेरोजगारी याचे प्रमाण मोठे आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही सुधारणा करताना किंवा सोयीसुविधा मिळविताना त्याचे काही परिणामही दिसून येतात. ज्याप्रमाणे गेल्या १० वर्षांत भारतातल्या जवळपास सर्व भागांमध्ये एटीएम म्हणजेच २४ तास पैसे काढण्याची सुविधा असलेले मशीन जागोजागी बसविले गेले. भारतात आज जवळपास १ हजार ठिकाणी हे एटीएम बसविले गेले आहेत त्याचा वापरही मोठ्या प्रमाणावर होतो. कारण लोकांना केवळ पैसे काढण्यासाठी बँकेत जाण्याची गरज पडत नाही. जाण्यायेण्याचा वेळ वाचतोच शिवाय रात्री अपरात्री केव्हाही गरजेनुसार पैसे काढता येतात. ही सुविधा इतकी चांगली आहे की, यात बँकांचाही खर्च वाचला आणि लोकांचा वेळ वाया जात नाही. परंतु, बंगलोरमध्ये एका एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी गेलेल्या महिलेवर हल्ला होण्याचा प्रकार घडला आणि आता या एटीएमच्या सुरक्षेविषयी फार मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका इसमाने शस्त्राचा धाक दाखवून त्या महिलेला पैसे काढायला सांगितले. तिने नकार दिल्याबरोबर त्याने तिच्यावर शस्त्राने हल्ला केला आणि तिचा मोबाईल घेऊन तो पळाला. याचा अर्थ त्याच्यापुढे एटीएममध्ये जाताना अनेक गोष्टींची दक्षता घ्यावी लागेल. प्रामुख्याने बंगलोरमधील घटना म्हणजे एटीएममध्ये जाणाऱ्या महिलांसाठी एक धोक्याचा इशाराच ठरतो. कारण आज सगळ्याच एटीएम केंद्रावर सुरक्षा रक्षक उपलब्ध नसतात. काही बँकांनी ही सुविधा ठेवलेली आहे. इतरांना प्रत्येक एटीएमवर सुरक्षा रक्षक ठेवणे परवडणार नसल्याने त्या ठिकाणी पैसे काढायला जाताना ग्राहकांना जास्त सावधानता बाळगावी लागेल. आधुनिक तंत्रज्ञानाने एटीएम म्हणजे एनी टाईम मनी देण्याची सुविधा ग्राहकांना दिली. पण याच एटीएममुळे चोरट्यांनीदेखील आता एनी टाईम मनी मिळवता येणे सोपे होऊ शकते. यावरून आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान आणि विज्ञानामुळे सोयीसुविधा मिळतात परंतु त्याचा वापर करताना सावधानता बाळगण्याचे बंधनही येऊन पडते.

## तंत्रज्ञानाबरोबरच तितकीच जोखीम

भारतामध्ये अजूनही ही सुविधा प्रत्येक गावापर्यंत पोहोचलेली नाही. ग्राहकांसाठी आणि बँकांसाठी देखील हा प्रकार अत्यंत सोयीचा मानला जातो. देशात कुठेही प्रवास करताना रोख रक्कम जवळ बाळगावी लागत नाही. त्या त्या गावाला गेल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे एटीएममधून पैसे काढता येऊ शकतात. प्रवासामध्ये पैसे गहाळ होण्याचा चोरीला जाण्याचा किंवा ते पैसे सांभाळत बसण्याचा धोका पत्करावा लागत नाही. तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर केल्यामुळे वेळ, पैसा आणि शक्ती या तिन्ही गोष्टींची बचत होत असते. प्रामुख्याने मध्यमवर्गीय किंवा उच्चमध्यमवर्गीय ग्राहक मोठया प्रमाणावर एटीएमचा वापर करीत असतात. मात्र आता या एटीएमचे धोकेही समोर येऊ लागले आहेत. एटीएममध्ये हल्ले होण्याचे दोन प्रकार आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात घडले. आंध्र प्रदेशातल्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यूही झाला. कर्नाटकात हल्ला झालेली महिला सुदैवाने वाचली. यातला करुणाजनक भाग म्हणजे ज्या दिवशी या महिलेवर हल्ला झाला, त्या दिवशी तिच्या ४ वर्षांच्या मुलीचा वाढदिवस होता एटीएममधून पैसे काढून ती वाढदिवसासाठी काही वस्तू खरेदी करुन घेऊन जाणार होती. परंतु, हल्ला झाल्यामुळे ती घरी जाऊच शकली नाही आणि आपल्या एकुलत्या एका लाडक्या मुलीचा वाढदिवस साजरा करू शकली नाही. रुग्णालयात उपचार झाल्यानंतर तिला तिने आपल्या पतीला सर्वप्रथम मुलीचा वाढदिवस साजरा झाला का? असा पहिला प्रश्न विचारला होता. यावरून ज्या उद्देशाने एटीएममध्ये गेली त्या भावना या हल्लेखोरांने उधळून लावल्या. मात्र या घटनेनंतर एकूणच एटीएमच्या सुरक्षिततेबरोबर पैसे काढण्यासाठी जाणाऱ्याच्या संरक्षणाचाही प्रश्न पुढे आला आहे.

## सुविधेचा गैरवापर नको

जर बँकांनी एटीएमवर सुरक्षा रक्षक तैनात केले नाही तर जपानप्रमाणे इथे देखील एटीएम लुटून नेणाऱ्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या तयार होतील. जपानमध्ये एटीएमचे आख्खे मशीनच पळवून नेणारे गँगस्टर्स मुबलक झाले आहेत. याचे लोण भारतात यायला वेळ लागणार नाही. आज ना उद्या सगळ्या बँकांना किंवा सरकारला एटीएमच्या संरक्षणाचा विचार करावा लागेल. कदाचित ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने एटीएमवर नजर ठेवण्याची व्यवस्था निर्माण करता येऊ शकते. आज देशातल्या १ हजार एटीएमवर एक एक सुरक्षा रक्षक तैनात करायचे ठरविले तर दर महिन्याला जवळपास सव्वा तीन कोटी रुपये खर्च येणार आहे. येत्या तीन वर्षांत एटीएमची संख्या तीन हजारांपर्यंत जाईल आणि मग हा खर्चदेखील नऊ कोटींच्या घरात जाऊ शकतो. खर्चाच्या मुद्यापेक्षाही एटीएम आणि तिथे येणाऱ्या ग्राहकांची सुरक्षा जास्त महत्त्वाची आहे. लोकांना जर ही सुविधा द्यायची असेल तर संरक्षणाचा विचार करावा लागेल. तंत्रज्ञानाबरोबर येणाऱ्या जोखमीचाही विचार करावा लागेल अजून तर भारतातल्या ३० टक्के लोकांनीच एटीएमचा वापर सुरू केला आहे. ही संख्या जसजशी वाढत जाईल तसतशी सुरक्षा व्यवस्थाही निर्माण करावी लागेल. बिना सुरक्षा रक्षक एटीएम चालू ठेवणे याचा अर्थ भविष्य काळात चोरट्यांना एनी टाईम मनीची सुविधा आंदण दिल्यासाखे होईल केवळ सूचना देऊन चालणार नाही, त्याबरोबर सुरक्षिततेचे आश्वासनही आवश्यक ठरते. भारतामध्ये बँकिंगमधल्या बऱ्याच सुविधा ग्राहकांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत परंतु, त्यापूर्वी तंत्रज्ञानाचाही गैरवापर करुन पैसे पळविण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. याच एटीएममधून अनेक प्रकारच्या युक्त्या वापरून परस्पर पैसे काढण्याचे प्रकार घडू लागले आहेत. यावरून ईलेक्ट्रॉनिक बँकिंगचे फायदे मिळवत असताना त्याचे धक्केदेखील बँकांना आणि ग्राहकांना सहन करावे लागत आहेत. याची आतापासून योग्य ती दखल घेतली गेली पाहिजे. एका चांगल्या सुविधेचा निष्काळजीपणामुळे गैरवापर होता कामा नये.